**बातमी**

**कोविड -१९ महामारी च्या काळातील जिताडा नर्सरी तुन ग्रामस्थांना मिळाले उत्पादन**

फेब्रुवारी २०२० रोजी कांदळवन प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र वन विभागाने ठाण्याच्या भिवंडी तालुक्यातील मालोडी गावात जिताडा नर्सरी उभारली. त्याकरिता भा.कृ.अनु.प्र.-कैंद्रीय खारा जलजीव पालन अनुसंधान संस्थान यांनी तांत्रिक सहकार्य दिले. या प्रकल्पाचा मुख्य हेतू कांदळवनांवर आधारित लोकांना उपजीविकेचा शाश्वत पर्यायी मार्ग देणे व त्यांचा सामाजिक विकास करणे हा आहे. या प्रकल्पाकरिता गावातील कांदळवनांवर आधारित ७ लाभार्थ्यांची निवड केली गेली त्यात ३ महिला लाभार्थ्यांचा समावेश आहे. हि तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील पहिली नर्सरी आहे व याचे काम ऐन महामारीच्या काळात सुरु झाले. या प्रकल्पाकरिताचे आवश्यक प्रशिक्षण लाभार्थ्यांना नवसारी, गुजरात येथील भा.कृ.अनु.प्र.-कैंद्रीय खारा जलजीव पालन अनुसंधान संस्थान यांच्या जिताडा प्रकल्पावर देण्यात आले होते. कांदळवन प्रतिष्ठानने नेमणूक केलेल्या श्री. प्रसादराव रासकट्टा या प्रकल्प सहाय्यकाच्या मार्गदर्शनाखाली या नर्सरी मध्ये ५,४०० जिताडा पिल्ले सोडण्यात आली. महामारी करीता आवश्यक ती सर्व सावधानता आणि उपाययोजना करून या लाभार्थ्यांनी नेमून दिलेली खाद्य देणे, पिल्लांच्या वाढीचे मोजमाप करणे, जाळ्या साफ करणे अशी कामे वेळेत आणि प्रामाणिकपणे पार पाडली. या ३ महिन्यांच्या काळात पिल्लांची उत्तम वाढ बघायला मिळाली. या काळात पिल्ले ११-१५ सेमी या विक्रीयोग्य आकाराची झाली. हि सर्व पिल्ले नजीकच्या भागातील जिताडा पालन प्रकल्प राबवणाऱ्या शेतकऱ्यांना विकली गेली आणि त्यातून रु. ८८,००० एवढे उत्पन्न मालोडी गावच्या लाभार्थ्यांना मिळाले. या कठीण काळातही गावकाऱ्यांचे उत्पन्नाचे साधन अबाधित राहिले हे म्हणणे अयोग्य ठरणार नाही. या प्रकल्पाचे यश नक्कीच अनेक मासेमार बांधवाना नर्सरी प्रकल्पाकडे आकर्षित करेल आणि नवीन मासेपालन प्रकल्पांना चालना देईल. हा प्रकल्प राबविण्याकरिता भिवंडीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती चेतना शिंदे तसेच कांदळवन प्रतिष्ठानाचे सहाय्यक संचालक श्री. सुशांत सनये व भा.कृ.अनु.प्र.- कैंद्रीय खारा जलजीव पालन अनुसंधान संस्थानचे वैज्ञानिक श्री. पंकज पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच श्री. वीरेन्द्र तिवारी, कार्यकारी संचालक, कांदळवन प्रतिष्ठान आणि श्रीमती निनू सोमराज, सह संचालक, कांदळवन प्रतिष्ठान यांचे मोलाचे सहकार्य या प्रकल्पास लाभले.